# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.११९/२०२३

विषय :— औषधनिर्माणशास्त्र शाखेतील अध्यापकांच्या शिक्षक मान्यतेच्या अर्हतेबाबत...

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेले परिपत्रक संदर्भ क्र. १४—१६३/२०२१—PCI /१२७३०, दि. ०८ ऑगस्ट, २०२२ अन्वये औषधनिर्माणशास्त्र शाखेतील अध्यापकांची नियुक्ती व पदोन्नती देताना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि. ३० जून, २०१० रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रामध्ये नमूद केलेल्या अर्हतेनुसार व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे नमूद केलेले आहे. त्यास अनुसरून दि. १६ मार्च, २०२३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या सभेतील ठराव क्र. वि.प.क्र.अ८पीए/८/२०२३ नुसार मा. कुलगुरू यांनी गठित केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालास मा. कुलगुरू यांनी मंजुरी दिलेली असल्याने औषधनिर्माणशास्त्र शाखेतील अध्यापकांना शिक्षक मान्यता देताना शैक्षणिक वर्ष २०२३—२४ पासून महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत दि. ११ सप्टेंबर, २०१९ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर अध्यापकांच्या अर्हतेचे निकष ग्राह्य धरण्यात येतील.

औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्यांनी सदर बाब संबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

गणेशखिंड, पुणे — ४११००७
जा. क्र. सीसीओ/ १७०५१
दि.१९ जून, २०२३

Rasve 19/6/2023
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
मा. प्राचार्य, सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक.